**भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. १४१/२०१३ मधील**

**अर्ज निशाणी क्रमांक ३१ खालील आदेश**

( **CNR–MHWS**050001622011 )

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी, दिनांक ७.३.२०११ रोजीच्या मृत्यूपत्राच्या लेखाची प्रमाणित प्रत, कलम ४ ची दिनांक ३१.१०.२००८ रोजीची नोटीस, गट क्र. १४३ चा सातबारा उतारा, १५.३.२००४ रोजीचे लाईट बील, दोन खरेदी खतांच्या सत्यप्रती, दोन मुल्यांकन अहवाल, आणि एल.ए.सी. क्र. ११६/२०१३, १४४/२०१३, १५३/२०१३ व ४१६/२०१३ यातील दिनांक १२.२.२०१६ रोजीच्या न्यायनिर्णयाची ऑनलाईन काढलेली संगणकीय प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास गैरअर्जदार क्र.१ यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. अर्जदार यांचेतर्फे विधीज्ञ श्री पी. एम भगत यांचा आणि गैरअर्जदार क्र. १ यांच्या तर्फे विधीज्ञ श्री व्ही. टी. आकोटकर यांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार दाखल करु इच्छित असलेली उपरोक्त ९ दस्तऐवज अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत काय? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | ..अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. ०१ बाबत** :–

३. अर्जदार यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा रेफरंन्स अर्जदाराने भुमीसंपादन अधिनियम,१८९४ चे कलम १८ अन्वये दाखल असून प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराच्या पुराव्याकरीता प्रलंबीत आहे. अर्जदार हे दिनांक ७.३.२०११ रोजीच्या मृत्यूपत्राच्या लेखाची प्रमाणित प्रत, कलम ४ ची दिनांक

३१.१०.२००८ रोजीची नोटीस, गट क्र. १४३ चा सातबारा उतारा, १५.३.२००४ रोजीचे लाईट बील, दोन खरेदी खतांच्या सत्यप्रती, दोन मुल्यांकन अहवाल, आणि एल.ए.सी. क्र. ११६/२०१३, १४४/२०१३, १५३/२०१३ व ४१६/२०१३ यातील दिनांक १२.२.२०१६ रोजीच्या न्यायनिर्णयाची ऑनलाईन काढलेली संगणकीय प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल करीत आहे. तरी, त्याची परवानगी देण्यात यावी.

४. याउलट गैरअर्जदार क्र. १ यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, संबंधीत कागदपत्रे दाखल करण्यास अर्जदाराने खूप विलंब केलेला आहे. तरी, अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुतचा रेफरंन्स हा अर्जदाराच्या पुराव्याकरीता प्रलंबीत असून, अर्जदार हे उपरोक्त ९ कागदपत्रे दाखल करु इच्छीत आहे व ते दस्तऐवज प्रस्तुतचा रेफरंन्स गुणदोषावर निकाली काढण्यास उपयुक्त ठरु शकतात. त्यामुळे ते दस्तऐवज अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत आणि अर्जदार यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. तसेच गैरअर्जदार यांना त्या दस्तऐवजांच्या अनुषंगाने साक्षीदार यांचा उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.३१ हा मंजुर करण्यात येत आहे आणि अर्जदार यांना उपरोक्त दस्तऐवज दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.02.09 15:58:48 +0530

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक : ९.२.२०२६.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर.

<u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per original Order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- C.R.Gadge |
| 2) | Name of Court | :- Civil Judge (S.D.), Mangrulpir. |
| 3) | Date | :-9.2.2026 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :-9.2.2026 |
| 5) | Order uploaded on | :- 9.2.2026 |